Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक ४५ ] सोमवार, सप्टेंबर ९, २०१९/भाद्रपद १८, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार- ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १४८.

### आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ ते ३० अन्वये मौजा-हुडकेश्वर (बु.) व नरसाळा येथील नविन विकास योजना आराखडा तयार करणेबाबत.**

क्रमांक मनपाना-नरवि-प्रा.वि.यो.-कलम-२३-४८२-२०१९.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र.३००(अ)-९७-नवि-९, दिनांक ७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर झाली असून ती दिनांक १ मार्च २००० पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र.टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१ सप्टेंबर २००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला "नियोजन प्राधिकरण" म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय क्रमांक टिपीएस-१८९९-११९१-प्र.क्र. ८०-९९-नवि-१३, दिनांक २३-७-१९९९ अन्वये नागपूर महानगर क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. सदर महानगर क्षेत्राकरीता शासनाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४०९-२८९०-प्र.क्र.३५६-०९-नवि-९, दिनांक ३१ ऑगस्ट २०१० अन्वये नागपूर सुधार प्रन्यासची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. उक्त महानगर क्षेत्रातील मौजे-हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा ही महसुली गावे शासन अधिसूचना क्रमांक नामपा-२०११-प्र.क्र. १-नवि-२६, दिनांक १४ मे २०१३ अन्वये उक्तप्रमाणे घोषित केलेल्या महानगर क्षेत्रातून वगळून नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट केलेले आहे तसेच शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४१३-४०५-प्र.क्र. २१३-२०१३-नवि-९, दिनांक १४ ऑक्टोबर २०१३ अन्वये उक्त मौजे हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरिता नागपूर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी मौजा हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता नविन विकास योजना तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये सुरू केलेले आहे. याबाबतचा ईरादा दिनांक २३ जुलै, २०१९ च्या सर्वसाधारण सभेमधील ठराव क्रमांक ४११ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिकेत नव्याने अंतर्भूत करण्यात आलेल्या मौजा हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा या वाढीव क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप विकास योजनेतील ९७२.८२ हेक्टर क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ अन्वये नविन विकास योजना आराखडा तयार करण्याचा इरादा ठराव क्रमांक ४११, दिनांक २३ जुलै २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिकेने केलेला आहे व त्याअनुषंगाने मौजे-हुडकेश्वर (बु.) व मौजे नरसाळा वाढीव क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ ते ३० अंतर्गत प्रारूप विकास योजना (Draft Development) तयार करण्याची जबाबदारी नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेची आहे. याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम २३ अंतर्गत उक्त क्षेत्राकरीता विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे (To declare intention to prepare Draft Development Plan) तसेच कलम २४ अंतर्गत शासनाकडून प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी, नगर रचना अधिकारी यांची नियुक्त करणे व नियुक्त झालेले नगर रचना अधिकारी या वाढीव क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत प्रारूप विकास योजना आराखडा तयार करून कलम ३० अंतर्गत मंजुरीकरीता शासनाकडे पाठविण्यासाठीची संपूर्ण कार्यवाही पार पाडण्यास्तव आयुक्त, नागपूर महानगरपालिका नागपूर यांना म.न.पा. सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रमांक ४११, दिनांक २३ जुलै २०१९ अन्वये अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये त्याबाबतचा इरादा जाहीर करीत आहे.

त्याअर्थी, आता, मौजा-हुडकेश्वर (बु.) व नरसाळा येथील नविन विकास योजना आराखडा ९७२.८२ हे. क्षेत्राकरीता तयार करावयाची आहे ते क्षेत्र दर्शविणारा नकाशा हा नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१ या कार्यालयात महानगरपालिका, नागपूर या कार्यालयात कार्यालयीन सुट्टीचे दिवसाखेरीज कार्यालयीन वेळात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ अन्वये नागरीकांना निरीक्षणासाठी ठेवण्यात येत आहे.

नागपूर :
दिनांक ४ सप्टेंबर २०१९.

**अभिजीत बांगर,**
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

---

भाग १-अ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १४९.

BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**Declaration of Intention to prepare Draft Development Plan in Mouza Hudkeshwar (B.) and Narsala area, Tah. & Distt. Nagpur under Sections 23 to 30 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. NMC-TPD-D.D.P.-Section 23-482-2019.—

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, Section 31(*1*) has been partly sanctioned by the Govt, *vide* Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9,Dt. 7th Jan. 2000 and came into force from 1st March 2000. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Government Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9,dt.10th September 2001 and came into force from dt. 21st september 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the 'Planning Authority' for Nagpur City except the areas covered under seven scheme *vide* Govt. Notification No TPS-2401-855-CR-76-UD-9,dt 27th February 2002.

And, whereas, Government had declared the Nagpur Metropoliton Area *vide* it's Notification No. TPS-1899-1191-CR-80-99-UD-13,dt 23rd July 1999. And for this Metropoliton are *vide* Government Notification No TPS-2409-2890-CR-356-UD-9, dt. 31st August 2010 the Government had declared the Nagpur Improvement Trust as a Special Planning Authority. As per the Government Notification No. NMC 2011-CR-1-UD-26, dated 14th May 2013 the revenue villages of Mouza-Hudkeshwar (Bk.) and Mouza-Narsala excluded from Metropoliton Area and included in Nagpur Municipal Corporation area and also as per the Government Notification No. TPS-2413-405-CR-213-2013-UD-9, Dt. 14 October 2013, the Nagpur Municipal Corporation has declared as the Planning Authority for a area of Mouza-Hudkeshwar (Bk.) and Mouza-Narsala.

And whereas, the work of preparation of Development Plan for additional area i.e. Mouza-Hudkeshwar (Bk.) and Mouza-Narsala was started as per Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 according to the Resolution No. 411 of General Body Meeting of dated 23rd July 2019.

And whereas, Nagpur Municipal Corporation has declared its intention to prepare the Draft Development Plan for an area about 972.82 Hectare of Mouza-Hudkeshwar (Bk.) and Mouza-Narsala under Section 23 and to appoint Town Planning Officer for the said Draft Development Plan and to submit it to Government as per Maharashtra Regional and Town Planning, Act, 1966 under Section 30 *vide* its resolution No. 411 of General Body Meeting of dated 23rd July 2019 and whereas to preparation of Draft Development Plan to delegate the power to the Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur to complete all necessary formalities and to be submitted to Government for final approval. As per U/s. 23 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 declared a intention for preparation of Development Plan of Mouza-Hudkeshwar (Bk.) and Mouza-Narsala.

Now, therefore, the Boundary Plan of the area in which the Draft Development Plan is to be prepared for Mouza Hudkeshwar (Bk.) and Mouza-Narsala, area admeasuring about 972.82 Hectare is made available for inspection of public in working hours and excluding holiday under Section 23 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 in the office of the Town Planning Deptt., Wing B, Third Floor, Shri. Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Building, Mahapalika Marg. Civil Lines, Nagpur-440 001.

Nagpur :
Dated the 4th September 2019.

ABHIJIT BANGAR,
Commissioner,
Nagpur Municipal, Corporation,
Nagpur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.